# सूर्योदय आश्रम ट्रस्ट

मोखाडा, पालघर

Email : frfrada@gmail.com, www.suryodayamokhada.org

# वसई धर्मप्रांत

## सूर्योदय आश्रम ट्रस्ट
## ध्येय धोरण - दिशा आराखडा
## १ ऑक्टोबर २०१७

फा. फ्रान्सिस डाबरे
संचालक

फा. मायकल तुस्कानो
सहसंचालक

# सूर्योदय आश्रम ट्रस्ट, मोखाडा

(माळीपाडा - घोसाळी)

**विश्वस्त समीती**

१. फा. फ्रान्सिस डाबरे

२. फा. ज्योएल डिकुन्हा

३. फा. राजेश लोपीस

४. फा. विश्वास दुमाडा

**संचालक / सहसंचालक**

१) फा. फ्रान्सिस डाबरे
संचालक

२) फा. मायकल तुस्कानो
(सहसंचालक)

**श्री. जयराम लक्ष्मण नडगे**
**समाज सेवक**

**ऑनिमेटर्स / कार्यकर्त्या**

१) विमल दखणे
२) नमुना दखणे
३) वैशाली माळी
४) आशा दिघा
५) भारती माळी
६) संगीता दिघा
७) सुमन धोडंगा
८) मंगला बाबू कोरडा

# सूर्योदय आश्रम ट्रस्ट, मोखाडा

सूर्योदय आश्रम ट्रस्ट, मोखाडा सदर संस्थेचे उद्‌घाटण २९ जानेवारी २००६ रोजी सकाळी १० वा. बिशप डॉ. थॉमस डाबरे ह्यांच्या शुभहस्ते आशीर्वाद देवून करण्यात आले. सूर्योदय आश्रम संस्था १९ एप्रिल २००६ रोजी सरकार दरबारी नोंदणी करण्यात आली. संस्था नांदणी क्र. E-5977 असा देण्यात आला.

पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालूका अत्यंत दुर्गम विभाग आहे. वसई पासून १३० कि.मी. तर मुंबईहून १५० कि.मी.दूर आहे. अत्यंत गरीबीमुळे आणि सरकारी सुखसोयीच्या अभावामुळे विकासापासून खूप दूर आहे. कुपोषण आणि रोगराईमुळे लोकांना मोठया समस्यांला तोड दयावे लागते. स्थानिक पातळीवर पाण्याचे दुर्लभ असल्यामुळे ऑक्टोबर ते जून पर्यंत अनेक लोक स्थलांतर करतात., वसई, डहाणू, भिवंडी आणि तलासरी येथे कामानिमित्ताने दूरवर राहतात.

वसई धर्मप्रांताने २००२ पासून पूढाकार घेऊन वैदयकीय शिबिर प्रत्येक मंगळवारी एका झाडाखाली घेण्यास सुरूवात केली. अनेक रोगी दूरवरून औषधासाठी येऊ लागले. काही आजारी लोकांना संस्थेच्या गाडीमध्ये तलासरी, वापी, नासिक, वसई आणि मुंबई येथे पूढील उपचारासाठी नेण्यात येत असे. खूप लोकांना वैद्यकीय शिबिराचा फायदा होऊ लागला म्हणून मोखाडा तालूक्यात ही बातमी पोहचली आणि आजारी लोकांचा लोंढाचा-लोंढा येऊ लागला.

गावागावातून १० महिला निवडण्यात आल्या. त्यांना विशेष प्रबोधन आणि प्रशिक्षण देवून सक्षम करण्यात आले. प्रत्येकांना तीन-चार गावे देण्यात आली. त्यांनी गावामध्ये सर्वेक्षण केले., घरोघरी जाऊन माहिती गोळा केली. त्या माहितीमुळे गावातील समस्या संस्थेला मिळाली. त्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले, आणि त्या दहा कार्यकर्तीना बरोबर घेऊन दिशा उद्दिष्ट आणि हेतू ठरविण्यात आले. काही समस्यांना प्राधान्य देण्यात आले.

**चार प्रमुख ध्येय प्राधान्य प्रमाणे :- आरोग्य, शिक्षण, महिला सक्षीमीकरण आणि सरकारी योजनेचा लाभ** असे चार ध्येय घेऊन सूर्योदय आश्रम कामाला लागली. कार्यकर्तीच्या सहभागामुळे आणि त्यांच्या विश्लेषणामुळे त्यांचाच सहभाग सक्रीय होऊ लागला. सर्व कार्यकर्ती गावात जाऊन कार्य करायला लागल्या, त्यांना लोकांचा प्रतिसादही खूपच चागला मिळाला. गावामध्ये मुलांचा संघ आणि टयूशन वर्ग, महिला सहाय्यता गट, स्तनदा आणि गरोदर मातांची वेळोवेळी तपासणी, कुपोषीत बालकांना सरकारी योग्य आहार अशा कामाद्वारे खूपच फरक गावात पडू लागला. प्रत्येक सोमवारी कार्यकर्तीची सभा घेऊन योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्यात आले. त्यांना जव्हार, वसई आणि तलासरीला भेट देण्यासाठी नेण्यात आले त्यामुळे त्यांच्यामध्ये जागृती निर्माण झाली. सदर कार्यामूळे गाव-गावात खूपच फरक दिसू लागला. त्यांच्या जीवनात फरक दिसू लागला.

**धोरण विधान** / Vision -आदीवासी लोकांचा विकास आदीवासीच करणार.

**ध्येय विधान**/ Mission - मोखाडाच्या ३५ गाव-पाडामध्ये आरोग्य शिक्षण, महिला सक्षीमीकरण आणि सरकारी योजनेचे कार्य.

# सूर्योदय आश्रम ट्रस्टने गावागावात जावुन सर्वेक्षणातून आलेली उद्दीष्टे

## उद्दीष्टे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) सरकारी आरोग्य सेवंचे लाभ गर्भधारण झालेल्या स्त्रियांना देणे | २) आरोग्य चांगले राहण्यासाठी स्वच्छेतेतर्फे विषयी प्रबोधन आणि जाणीव जागृती करणे. | ३) मानवी आरोग्याला अपायकारक गोष्टीविषयी प्रबोधन करणे नशबंदी बिडी दारू तंबाखू | ४) अंध श्रध्देविषयी प्रबोधन करण. | ५) बालीका संरक्षण करणे. | ६) बालमृत्यू प्रमाण कमी करणे | ७) नियमीत योग्य आहार देणे. | ८) माहिला सक्षमीकरण करणे | ९) ग्रामीन भागातील मुलांचे शैक्षणीक दर्जा सुधारणे. |

### उपक्रम :–

**1) सरकारी आरोग्य सेवेचा लाभ गर्भधारणा झालेल्या स्त्रियांना देणे.**

1) गरोदर स्त्रीयांची नावे घेणे / वय लिहणे.
2) दररोज औषध घेतात का नाही हे पाहणे, अशा वर्करची मदत घेणे.
3) सरकारी योजना मिळतात ते पाहणे.
4) टि.टि.चे इंजेंक्श्न घेणे.
5) लोह–गोळया घेणे.
6) मुलांना अंगावरचे दुध पाजणे.
7) एकत्रीत गरोदर स्त्रियांची सह्या घेवून प्रबोधन करणे.
8) दाईचे नावे / सह्या घेणे.
9) बाळाचे वजन तपासणे.

**2) आरोग्य चांगले राहण्यासाठी स्वच्छतेविषयी प्रबोधन आणि जाणीव जागृती करणे. :**

1) दाईंची नावे / सह्या घेणे.
2) स्वच्छते विषयी माहिती– नखेकापणे, दात धुणे, ब्लेड, आंघोळ स्वच्छ कपेडे
3) स्वच्छतेविषयी माहिती व सभा घेणे.
4) सरकारी योजनेची माहिती व लाभा मिळवून देणे.
5) सरकारी होस्पीटल / PHC माहिती देणे.

**3) आरोग्य अपायकारक गोष्टी विषयी प्रबोधन करणे:** नशाबंधी, दारू, बिडी, तंबाखू:

1) प्रबोधन जाणीव जाृती करणे.
2) गरोदर स्त्रियांना नशाबंदी विषयी जागृती करने.
3) सभा घेऊन प्रबोधन करणे

**4) अंधश्रद्धे विषयी प्रबोधन करणे.**

1) अंधश्रद्धेविषयी जाणीव जागृती व प्रबोधन करणे.
2) विविध कार्यक्रम, सरकारी नियमाविषयी प्रबोधन करणे.
3) समविचारी संस्थांशी भेट करणे.
4) स्थानिक भगत, सभा, संवाद, प्रबोधन करणे.
5) स्थानिक सरपंच सदस्य, सरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक सह्या विचारनिमय करणे.

**5) बालीका संरक्षण करणे.**

1) स्त्रि–पुरूष भिन्नता पाहणे
3) बालिका जिवण विषयी प्रबोधन करणे.
3) चित्रपट विडीओ दाखवणे.
4) शाळा बोर्डिंगला पाठवणे.
5) मुलींच्या लग्नाविषयी कायदा +प्रबोधन करणे.
6) S. H.G. गटामधे सातत्याने प्रबोधन करणे.
7) मुली गायब होता की नाही हे पाहणे.

**6) बालमृत्यू प्रमाणे कमी करणे.**

1) बालमृत्यू झालेल्यांची यादी तयार करणे.

2) बालमृत्यूचे कारण शोधणे लिहीणे.

3) सरकारी योजनेचा लाभ देणे. अशा कार्यकत्यांबरोबर.

4) स्त्रियांच्या सभेमध्ये वारंवार चर्चा करणे.

5) नियमित औषधे सरकारी उयावेत.

6) घरोघरी भेटी देवून चर्चा करणे.

**7) नियमित योग्य आहार देणे.**

1) गरोदर स्त्री, स्तनदा, बालके ह्यांना योग्य आहार देणे.
2) नियमित औषध देणे.
3) रेषन दुकानदाराबरोबर संवाद व उपक्रम घेणे.
4) आशा कार्यकर्ती, अंगणवाडी कार्यकर्तीबरोबर संवाद व कार्यकरणे
5) नियमीत वजन तपासणे – बालकाचे + आईचे
6) नियमीत डॉक्टर्स संपर्क करणे.

**8) महिला सक्षमिकरण करणे.**

1) प्रत्येक गावागावात भेटी देवून महिलांशी संपर्क करणे.
2) महिला बचत गट स्थापन करणे.
3) गावापाडयामध्ये सभा घेणे.
4) नियमित प्रबोधन ठेवणे
5) संस्थेला शैक्षणीक सभा घेणे.
6) सर्व पदाधिकारांची सभा घेणे.

**9)ग्रामिण भागातील मुलांचा शैक्षणिक दर्जा सुधारणे.**

1) शाळा बाह्य मुलांचा सर्वे करणे
2) शिक्षणविषयी सभा, जाणीव जागृती करणे.
3) टयुशन क्लास दररोज घेणे.
4) लामांकीत इंग्रजी शाळेमधे पुढील शिक्षणसाठी पाठवणे– उदा. वसई, डहाणू.
5) पालक, शिक्षक सभा घेणे.
6) मुलांच्या अडीअडचणी सोडवणे.
7) मुलांच्या ॲडमिशनसाठी मदत करणे.
8) शासनाच्या योजनेची माहिती देणे– उदा. शिष्यवृत्ती.
9) स्पर्धा परीक्षेविषयी प्रबोधन करणे.

## साध्य : ( Indicator)

1)शाळाबाह्या विदयार्थंच्या प्रमाणात घट दिसुन येत आहे. पडताळणी, शिक्षक, पालक मुख्याध्यापक कार्यंकर्ते

2) गावागावामध्ये शिक्षणाच्या प्रमाणात वाढ दिसुन येत आहे. विदयार्थी , पालक, शिक्षक, मुख्याध्यापक

3) माहिला सक्षमिकरण झालेले आहे.
गावातील महिला, महिला बचत गट

4) आरोग्य विषयी जाणीव जागृती झाली आहे.
आशा कार्यकर्ती अंगणवाडी कार्यकतींनी A.N.M. MPW. आणि ग्रामस्थ

5) सरकारी योजना मिळायला लागल्या आहेत.
1) गावातील वृध्दमाणसे
2) महिला बचत गट
3) ग्रामस्थ, शेतकरी

6) लोकांमध्ये आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, सरकारी योजना, नोकरी उपजिवीका, शेती विषयी माहीती आहे.
1) आशा कार्यकर्ती
2) अंगणवाडी
3) महिला गट

# सुर्योदय आश्रम ट्रस्ट, मोखाडा

| ग्रामपंचायतीचे नाव | विभाग | कुटुंब संख्या | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| केळघर | रानसान पाडा | ६५ | ४०९ |
| | धामणी | १२४ | ६९४ |
| साखरी | चारणवाडी | ५० | २९८ |
| | धारीचा पाडा | ३५ | १६५ |
| | वर्तक नगर | ६६ | ३०६ |
| | वरघाटपाडा | ७२ | ५२७ |
| | उंबरपाडा | ६५ | ३९१ |
| चास | चास | ८५ | ३३० |
| | चिकन पाडा | ६३ | ३२० |
| | हट्‌टी पाडा | ५० | २९१ |
| | हिंबरपाडा | २५ | १४० |
| | जामध्याचापाडा | ४० | १८८ |
| | पानगरी | १२० | ५५५ |
| | ठाकूरपाडा | १७५ | १०५९ |
| घोसाळी | घोसाळी | १५० | ८३५ |
| | गाभळपाडा | ८६ | ४८५ |
| मोखाडा | आंबेपानी | १०८ | ५१० |
| | बंगलापाडा | ६३ | १८२ |
| | बारीपाडा/माळीपाडा | २० | ११२ |
| | धोडीपाडा | २७ | १२५ |
| | घोटकरपाडा | १३० | ६६५ |
| | गुमबाडपाडा | २९ | १८१ |
| | जांभापाडा | ११ | ४१ |
| | कावलपाडा | ५५ | २५० |
| | लोहार पाडा | १५५ | ७४४ |
| | मोरीचापाडा | १६ | १०१ |
| | मोरखाडाक | १९ | १०५ |
| | तेलीपाडा | ४३ | २२० |

# आजपर्यंत सूर्योदय आश्रम ट्रस्ट तर्फे करण्यात आलेली कामे.

## तक्ता

| क्र. | कार्यकर्त्यांची नावे | कार्य करण्यात आलेली गावे | सरकारी योजना | महिला बचत गट | कुपोषीत बालके | गरोदर स्तनदा | अपंग | टयुशन वर्ग मुले +मुली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आशा वामन दिघा | गभालपाडा<br>घोसाळी<br>धोडीपाडा | 5 | 7 | 12 | 15<br>17 | 10 | 28 |
| 2 | भारती कमळाकर माळी | टाकपाडा<br>अंबिकावाडी<br>तळयाचापाडा | 2 | 3 | 13 | 13<br>10 | 3 | 22 |
| 3 | विमल जयराम दयाणे | चास होळीची<br>वरची आळी<br>घोडीचा पाडा<br>धरिचा पाडा | 10 | 8 | 16 | 18<br>17 | 2 | 36 |
| 4 | नमुना रामचेंद्र दखणे | चार पांगरी<br>चिकण पाडा<br>जामदयाचा पाडा | | 5 | 5 | 9<br>16 | | 24 |
| 5 | सुमन नाना धोडगा | धटकरपाडा<br>बकुळीपाडा<br>कावलपाडा | 1 | 5 | 19 | 11<br>21 | 3 | 20 |
| 6 | संगीता धवळू दिघा | वरतकनगर<br>दर्गाआळी<br>आबेपाना | 8 | 4 | 8 | 9<br>21 | 2 | 22 |
| 7 | वैशाली जयराम माळी | झरीपाडा<br>माळीपाडा<br>दिबटपाडा<br>वारघडपाडा | | 5 | 10 | 5<br>4 | 3 | 26 |
| 8 | मंगला बाबु कोरडा | रांचनपाडा<br>धारेचापाडा<br>चारणवाडी | | —<br>2<br>3 | 6<br>3<br>2 | 4<br>2<br>1 | 1<br>—<br>— | 18<br>—<br>— |

# सूर्योदय आश्रम ट्रस्ट, मोखाडा

**सेवक –सेविकाचे काम व जबाबदारी**

1) दररोज विद्यार्थ्यांचे ट्युशन वर्ग घ्यावेत योग्य वेळी

2) दररोज आपल्या विभागांत महिलांच्या सीाा/भेटी द्यावेत.

3) दर सोमवारी साप्ताहिक मिटींगला येणे, येताना कामाचा आढावा लेखी स्वरूपात आणणे.

4) दररोज गावामध्ये पुढील गोष्टी कराव्यात.

गरोदर, स्तनदा, आजारी, अपंग,वयस्कर, तान्हूला भेटी देणे

5) महिला सभा आठवड्याला घेणे.

**तक्ता**

1) सेवक–सेवीकाचे नाव–

2) गावाचे नाव–

3)तारीख/वेळ

4) महिलांच्या सभा– किती कुठे

विषय

नियोजन महिलांचा प्रतीसाद

**5) गावभेटी–कोणाला भेटले–**

1.गरोदर

2.स्तनदा

3. आजारी

4. अपंग

5. वयस्कर,

6. तान्हूला

7. काय सांगितले

**6)**

**शेवट :** सूर्योदय संस्थेमार्फत तयार केलेले नियोजन भावि काही काळासाठी कार्य करण्यास अत्यंत उपयोगी ठरेल. गावा–गावातून मिळालेल्या माहितीमुळे आणि विश्लेषण केल्यामुळे संस्थेसाठी एक कार्यदिशा काही वर्षासाठी मिळाली आहे. गावपरिवार आणि संस्थेच्या कार्यकर्तीद्वारे सक्रीय सहभाग मिळाला आहे म्हणूनच कार्य करण्यास उत्साह मिळतो.